श्री चिपाडे समिर जयप्रकाश, तत्का कनिष्ठ सहाय्यक, प्रा.आ.केंद्र बेलवंडी ता.श्रीगोंदा यांनी कार्यालयीन कामकाजात अनियमितता केलेने शिस्तभंगाची कारवाई करणे बाबत

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/२५७५९०८/६५२/२०२६
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १. इकडील निलंबन आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-१/९८६/२०२३ दिनांक ०२/०८/२०२३
२. इकडील ज्ञापन दोषारोपपत्र क्र.साप्रवि-१/आस्था-३/२८२३/१५१८/२३ दिनांक ०४/१२/२०२३
३. इकडील पुनस्थापित आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-१/१५८२/२०२३ दिनांक १३/१२/२०२३
४. तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपुर यांचेकडील पत्र क्र.आरोग्य/वशि/४४१/२०२५ दिनांक १८/०९/२०२५ समवेत श्री चिपाडे यांचा खुलासा दिनांक १८/०९/२०२५
५. इकडील कारणे दाखवा नोटीस जा.क्र. साप्रवि-१/आस्था-३/२५७५९०८/१९४/२०२६ दिनांक ३१/०३/२०२६
६. तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपुर यांचेकडील पत्र क्र.आरोग्य/वशि/१५४/२०२६ दिनांक १६/०४/२०२६ समवेत श्री चिपाडे यांचा खुलासा दिनांक १६/०४/२०२६
७. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (१)

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये श्री चिपाडे समिर जयप्रकाश, कनिष्ठ सहाय्यक, हे कनिष्ठ सहाय्यक, या पदावर प्रा.आ.केंद्र बेलवंडी ता.श्रीगोंदा येथे कार्यरत असताना श्री चिपाडे यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने त्यांना संदर्भ क्रमांक १ च्या आदेशान्वये सेवेतुन सेवा निलंबित करणेत आलेले होते. संदर्भ क्रमांक २ नुसार दोषारोपपत्र १ ते ४ बजावणेत येऊन खुलासा सादर करणे बाबत कळविणेत आलेले होते. त्यानुसार श्री चिपाडे यांनी सदर दोषारोपपत्राचा दिनांक १८/०९/२०२५ नुसार तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपुर यांचेमार्फत खुलासा सादर केलेला आहे.

श्री चिपाडे यांनी सादर केलेल्या खुलाशाचे अवलोकन केले असता श्री चिपाडे यांनी ज्ञापन दोषारोपत्रातील आरोप १, २ व ३ काही प्रमाणात मान्य केलेचे दिसून आले व आरोप क्र ४ बाबत श्री चिपाडे यांनी पुर्वपरवानगीने रजा घेतली होती व सदर रजेचे वेतनही श्री चिपाडे यांना अदा केलेचे नमुद केले आहे. तसेच श्री चिपाडे यांचे कौटुंबिक कारणास्तव दरम्यानचे कालावधीमध्ये त्यांना दोषारोपात्राचा खुलासा देण्यास विलंब झाला होता. त्या बाबत श्री चिपाडे यांनी क्षमा मागीतलेली असुन सदरचा खुलासा मान्य करुन शिस्तभंगविषयक कारवाई न करणे बाबत विनंती केली.

श्री चिपाडे यांचा खुलासा समाधानकारक नसलेने संदर्भ क्रमांक ५ नुसार कारणे दाखवा नोटीस बजावणेत येऊन त्यांनी प्रा.आ.केंद्र बेलवंडी ता.श्रीगोंदा येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामकाजात हलगर्जिपणा करुन महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२) नुसार, श्री चिपाडे यांची पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशारितीने दोन वर्षाकरीता थोपविणे ही शिक्षा का करणेत येऊ नये? या बाबतचा खुलासा सदर करणे बाबत कळविणेत आले.

संदर्भ क्रमांक ६ नुसार श्री चिपाडे यांची खुलासा सादर केलेला आहे. श्री चिपाडे यांचा खुलासा अंशत: मान्य करणेत येत असुन अंतिम कारणे दाखवा नोटीशीमध्ये नमुद केले शिक्षेऐवजी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (१) नुसार, श्री चिपाडे समिर जयप्रकाश, कनिष्ठ सहाय्यक, यांचेवर ठपका ठेवणे ही शिक्षा या आदेशाव्दारे अंतिम करण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री चिपाडे समिर जयप्रकाश, कनिष्ठ सहाय्यक, तालुका आरोग्य अधिकारी, कार्यालय, पंचायत समिती श्रीरामपुर यांच्या मुळ सेवापुस्तकात घेणेत यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषद www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक ..........20260720040129................................. असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 20-07-2026 22:18:10

(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री चिपाडे समिर जयप्रकाश, कनिष्ठ सहाय्यक, ता.आ.अधि कार्यालय पं.स.श्रीरामपुर
द्वारा:- तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपुर

प्रत:- तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपुर
२/-सदर आदेशा संबंधितास बजावणेत येऊन बजावले बाबत पोहोच इकडेस सादर करावी.

प्रत:- वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र बेलवंडी ता श्रीगोंदा